शनिवार, २५ सप्टेंबर २०२१

◆ वर्ष १४ ◆ अंक ६८
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

दाखले वाटप शिबिरास कळंबोलीत प्रतिसाद/२

बोगस मालक दाखवून जमिनीची खरेदी/५

मुंबईची पुन्हा हाराकिरी; कोलकाता विजयी/६

### यूपीएससी परीक्षेचा निकाल जाहीर; शुभम कुमार देशात पहिला

**नवी दिल्ली :** भारतीय लोकसेवा आयोगाने नागरी सेवा परीक्षा २०२०चा निकाल जाहीर केला आहे.



एकूण ७६१ उमेदवारांना या निकालामधून नियुक्ती देण्यात आली आहे. शुभम कुमारने या परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. शुभम कुमार हा आयआयटी बॉम्बेमधून बी टेक सिव्हील इंजिनिअर आहे, तर जागृती अवस्थी हिने मुलींमधून अव्वल क्रमांक पटकावला असून एकूण उमेदवारांमध्ये तिचे स्थान द्वितीय आहे. तिने भोपाळमधून बी टेक इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले आहे. निकालानुसार टॉप २५ उमेदवारांमध्ये १३ मुले आणि १२ मुलींचा समावेश आहे. शिफारस केलेल्या उमेदवारांमध्ये २५ व्यक्ती अपंगत्व असलेल्या (सात ऑर्थोपेडिकली अपंग, चार दृष्टिहीन, १० श्रवणदोष आणि चार अनेक अपंग) यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातून विनायक कारभारी याला ३७वा रँक मिळाला आहे.

# केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आज पनवेलमध्ये

## पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त सेवा व समर्पण अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेवा व समर्पण अभियान अंतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त रायगड जिल्हा भाजपच्या वतीने शनिवारी (दि. २५) दुपारी १ वाजता पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास केंद्रीय पर्यावरण व वनेमंत्री भूपेंद्र यादव, तसेच महाराष्ट्र राज्य विधानसभेचे विरोधी पक्षनेते माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाच्या प्रांगणात होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेश संघटन मंत्री श्रीकांत भारतीय, प्रदेश सरचिटणीस तथा रायगडचे माजी पालकमंत्री रवींद्र चव्हाण, सेवा समर्पण अभियानचे प्रदेश प्रमुख राज पुरोहित, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, आमदार महेश बालदी, महापौर डॉ. कविता चौतमोल, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष महेश





मोहिते यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते शासकीय योजनेतील लाभार्थींचा सन्मान, दिव्यांगांना मदत, कोरोनामुळे अनाथ झालेल्या विद्यार्थ्यांना मदत, तसेच कुष्ठरुग्णांना धान्यवाटप केले जाणार आहे.

एकात्म मानववाद भारतात रूजवणारा नेता म्हणून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जनमानसात ओळख आहे. संपूर्ण जग हे भांडवलशाही आणि साम्यवादावर वादविवाद करीत होते. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी तेव्हा याचा सुवर्णमध्य साधत एकात्म मानववाद मांडला. धर्म, अर्थ, काम मोक्षाकडे नेण्यासाठी असतात हा विचारही एकात्मवादात मांडला आहे. त्यांचा आदर्श घेऊन भाजपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सेवा व समर्पण अभियान अंतर्गत दिव्यांगांना कृत्रिम अवयव, उपकरणे वाटप, आरोग्य तपासणी शिबिर, गरीब वस्ती, अनाथाश्रम, वृद्धाश्रम व रुग्णालयांना भेट देऊन फळवाटप, प्लास्टिक निर्मूलन मोहीम, रक्तदान शिबिर, धान्यवाटप, कापडी पिशव्यांचे वाटप, नदीसफाई अभियान अशा प्रकारे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जाणार आहेत.

पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला भाजप व सर्व आघाड्यांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शक्तीकेंद्र, बूथ अध्यक्ष, तसेच कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे.

# पनवेल महापालिकेचा झंझावात

## ३०५ कोटींच्या विकासकामांना महासभेत मंजुरी


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांना अभिप्रेत असलेला पनवेल महानगरपालिका हद्दीतील विकास अल्पावधीतच वेगवान झालेला आहे. शहरासह ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे हा उद्दिष्ट ठेवून लोकप्रतिनिधी व प्रशासन काम करीत आहे. त्यामुळे विकासाचा महामेरू कायम राहून पनवेल महापालिका येत्या काळात राज्यातील उत्कृष्ट महापालिका ठरेल, अशी खात्री महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी शुक्रवारी (दि. २४) येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पत्रकार परिषदेस उपमहापौर जगदिश गायकवाड, ज्येष्ठ नगरसेवक अनिल भगत, नगरसेवक व प्रवक्ते प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानवर, प्रभाग समिती सभापती सुशिला घरत, हेमलता म्हात्रे, अनिता पाटील उपस्थित होते.

महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, पनवेल महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे काम सातत्याने केले जात आहे. त्याच अनुषंगाने पुन्हा एकदा विकासकामांचा झंझावात आज झालेल्या महापालिकेच्या महासभेत ३०५ कोटी रुपयांच्या विकासकामांना दिलेल्या मंजुरीवरून दिसून येत आहे. पनवेलचे मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असताना नागरिकांचा विकासही तशा पद्धतीने झाला पाहिजे या दूरदृष्टीतून नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर करण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्यपूर्ण पाठपुराव्याने करून घेतले आणि मोठ्या प्रमाणात विकासाला चालना मिळाली. पनवेल महापालिका हद्दीत अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकार होत असताना ग्रामीण भागातही स्मार्ट व्हिलेज योजना राबविण्यात येत आहे. त्यामुळे शहरांसोबत गावांचाही विकास साधला जात असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यातून आणि मार्गदर्शनातून विकासाचा आलेख उंचावत आहे.

महापौर डॉ. चौतमोल यांनी पुढे सांगितले की, आज दिनांक २४ सप्टेंबर रोजी झालेल्या महासभेत महापालिका हद्दीतील खारघर, कळंबोली व नवीन पनवेल या ठिकाणी सहा प्ले ग्राऊंड, १५ उद्याने विकसित करण्यासाठी २७ कोटी २५ लाख रुपयांची मंजुरी देण्यात आली. हे सर्व विकसित करीत असताना या ठिकाणी सोयीसुविधांयुक्त प्ले ग्राऊंड व उद्याने मिळणार आहेत. त्यामध्ये युवकांना खेळण्यासाठी बॅडमिंटन, लॉन टेनिस, क्रिकेट, बास्केटबॉल, हॉलिबॉल, स्केटिंग, लहान मुलांसाठी किड्स प्ले (खेळांचे साहित्य), तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, वॉकिंग ट्रॅक, तसेच ओपन जिमचा समावेश असणार आहे. **(पान २ वर..)**



(छाया : लक्ष्मण ठाकूर)



### असे असेल मुख्यालय

**पनवेल महापालिकेची प्रस्तावित इमारत ही तळघर, तळमजला, सहा मजले व सहावा वरचा मजला, तसेच टेरेसवर आर्ट गॅलरी अशी एकूण २५४१५.७६ एवढे क्षेत्र आहे. या भव्य अशा इमारतीस ढोबळ खर्च २८० कोटी रुपये अपेक्षित आहे. या कामाच्या अंदाजपत्रकाच्या दृष्टीने व आर्थिक उपलब्धतेनुसार काम करण्याच्या दृष्टीने दोन टप्प्यांमध्ये निविदा मागविण्यात येणार आहे.**

# राज्यात ४ ऑक्टोबरपासून शाळा होणार सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर बंद असलेल्या शाळा अखेर सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात आला आहे. त्यानुसार आता राज्यभरातील शाळा ४ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. शाळा सुरू करण्यासंदर्भात शिक्षण विभागाने मुख्यमंत्री कार्यालयाला प्रस्ताव पाठवला होता. हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

राज्यातील कोरोना संसर्गाचे प्रमाण काहीसे कमी होत असल्याने सर्व नियमांचे पालन करून शाळा सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. राज्यात ग्रामीण भागात पाचवी ते बारावीचे वर्ग आणि शहरी भागात आठवी ते बारावीचे वर्ग सुरू होतील. यासाठी टास्क फोर्स आणि राज्य सरकारने मिळून बनवलेली नियमावली सर्व शाळा, पालक आणि विद्यार्थ्यांना लागू असणार आहे.

### ७ ऑक्टोबरला मंदिरे खुली होणार

**मुंबई :** नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून म्हणजेच ७ ऑक्टोबरपासून राज्यातील सर्वधर्मियांची प्रार्थनास्थळे आरोग्याचे नियम पाळून भाविकांसाठी खुली करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, हा निर्णय म्हणजे एक प्रकारे उशिरा सुचलेले शहाणपण आहे, असा टोला भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी लगावला आहे.

# महाबळेश्वरमध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

- **बाळाच्या जन्मानंतर घटना झाली उघड**
- **११ जणांवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल**

**महाबळेश्वर : प्रतिनिधी**

महाबळेश्वर परिसरात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीने काही दिवसांपूर्वी बाळाला घरातच जन्म दिल्यामुळे खळबळ उडाली होती. तपासाअंती या मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचे समोर आले असून पोलिसांनी या प्रकरणी दोन मुख्य आरोपींसह नऊ जणांवर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आरोपींमध्ये शिवसेना नेते, माजी नगराध्यक्ष डी. एम. बावळेकर यांच्या सात्विक आणि योगेश या दोन मुलांचाही समावेश आहे.

पीडित मुलगी महाबळेश्वरमध्ये मोलमजुरी करून आपला चरितार्थ चालवते. मुख्य आरोपी सागर गायकवाड आणि आशुतोष बिरामणे यांनी या मुलीवर लैंगिक अत्याचार केले, ज्यातून ती गर्भवती राहिली. काही दिवसांपूर्वी या मुलीची घरातच प्रसूती करण्यात आली. तिने एका लहान मुलीला जन्म दिला. याबाबत वाईच्या उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. शीतल जानवे खराडे यांना माहिती मिळाल्यावर हा प्रकार समोर आला असून अधिक तपास सुरू आहे.



# दाखले वाटप शिबिरास प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी व नगरसेवक बबन मुकादम यांनी तहसीलदार विजय तळेकर यांच्याकडे केलेल्या मागणीनुसार सहा ठिकाणी शासकीय दाखले वाटप शिबिर आयोजित करण्यात आले आहे. त्या अंतर्गत शुक्रवारी (दि. २४) कळंबोली येथील ज्ञानमंदिर स्कूलमध्ये शिबिर झाले. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात झालेल्या या शिबिराला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



या वेळी पनवेल महापालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानवर, नगरसेवक अमर पाटील, बबन मुकादम, राजेंद्र शर्मा, नगरसेविका प्रमिला पाटील, भाजप कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, सरचिटणीस दिलीप बिस्ट, महिला अध्यक्षा मनीषा निकम, महिला मोर्चा उत्तर रायगड सरचिटणीस प्रिया मुकादम, दुर्गा सहानी, केशव यादव, संदीप भगत, भूषण जळे, रवी जाधव, कुमार विद्यानंद, देवीदास खेडकर, रमेश नायर, गौरव नाईक, मयूरी पेरवी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

रेशनकार्ड, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, डोमिसाईल, आधारकार्ड, वय व अधिवास, अशा विविध शासकीय दाखल्यांसाठी विद्यार्थी व नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचावा यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास प्रतिसाद लाभल्याचे दिसून आले.









पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी सुकापूरचे माजी उपसरपंच बुवाशेठ भगत, जि. प. सदस्य अमित जाधव, तसेच वाकडीचे नामदेव जमदाडे, कोप्रोली येथील रमेश पाटील यांच्या घरी गौरा गणपतीचे दर्शन घेतले. या वेळी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, सुकापूर ग्रामपंचायत सदस्य दिवेश भगत, भाजप सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, द्वारकानाथ बोकाडे, गुरुनाथ भोपी, आनंद ढवळे, उपसरपंच मंगेश पाटील, भालचंद्र भोपी, के. सी. पाटील, राजा पाटील, अशोक पाटील, शशिकांत खुटले, दीपक भगत, मयूर कदम आदी उपस्थित होते.



सिद्धेश्वर युवा मंडळ, दिघोडे, उरण



चैतन्य शेट्ये, पनवेल





भाजप युवा मोर्चा उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ग्रामपंचायत सदस्य नंदू ठाकूर, अभिमन्यू दापोलकर, संतोष पाटील, प्रवीण ठाकूर, हरी घरत, विकी म्हात्रे, रोहन कोळी आदी उपस्थित होते.

## दिल्लीत न्यायालय परिसरात थरार; तिघांचा मृत्यू

**नवी दिल्ली** : राजधानी दिल्लीतील रोहिणी न्यायालय परिसरात शुक्रवारी (दि. २४) झालेल्या गँगवॉरमध्ये जितेंद्र गोगी नावाच्या गुन्हेगाराची गोळी झाडून हत्या करण्यात आली. हल्लेखोर हे टिल्लू गँगचे शूटर असून ते वकिलाच्या वेशात आले होते. जितेंद्रवर गोळी झाडणाऱ्या दोघांचा पोलिसांनी एन्काऊंटर केला आहे. या घटनेत चार ते पाच जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## चिरनेर जंगल सत्याग्रहाचा आज ९१वा स्मृतिदिन

**चिरनेर : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथे जंगल सत्याग्रहाचा ९१वा स्मृतिदिन शनिवारी (दि. २५) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर साधेपणाने होणार आहे. १९३०च्या जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात या हेतूने चिरनेर येथे दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी अभिवादन करण्यात येते.

चिरनेर ग्रामपंचायत प्रशासन, उरण पंचायत समिती, रायगड जिल्हा परिषद आणि नवी मुंबई पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने या शासकीय अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते असते, परंतु या वर्षी हुतात्मा स्मृतिदिन कार्यक्रमावर कोरोनाचे सावट आहे.

चिरनेर सत्याग्रहात धाकू गवत्या फोफेरकर, नाग्या महादू कातकरी, रघुनाथ मोरेश्वर न्हावी, रामा बामा कोळी, परशुराम रामा पाटील, हसुराम बुधाजी घरत, आनंदा माया पाटील, आलू बेंबट्या म्हात्रे या शूरवीरांना हौतात्म्य आले होते.



पनवेल : नांदगाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक शुक्रवारी झाली. यामध्ये नंदादेवी ग्रामविकास आघाडीच्या अर्चना मिथुन पाटील यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली. याबद्दल भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी उपसरपंच अर्चना पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, नगरसेविका दर्शना भोईर, सरपंच विजेता मनोहर भोईर, उपसरपंच दीपक महादेव ठोंबरे, सदस्य धनश्री धनराज ठोंबरे, संध्या संदीप पाटील, विक्रम बाळकृष्ण फडके, तसेच के. सी. पाटील, युवा नेते भूपेंद्र पाटील, आनंद ढवळे, मयूर कदम व ग्रामस्थ उपस्थित होते.

पान १ वरून

## पनवेल महापालिकेचा झंझावात

पनवेल महापालिकेच्या सुलभ कामकाजाच्या दृष्टीने व नागरिकांच्या सोयीसुविधांसाठी अशा अद्ययावत मुख्यालयाची आवश्यकता आहे त्याकरिता नवीन पनवेल (पश्चिम) येथील भूखंड क्रमांक ४ सेक्टर १६, क्षेत्रफळ २००८६ चौरस मीटर क्षेत्रफळाचा भूखंड सिडकोकडून प्राप्त झाला आहे. या भूखंडाकरिता महापालिकेने २५ कोटी ५४ लाख ७२ हजार ७०१ रुपये सिडकोला अदा केले असून भूखंड पनवेल महापालिकेच्या ताब्यात घेण्यात आला आहे, तसेच याकरिता वास्तूविशारद सल्लागार म्हणून मे. हितेन सेठी यांची जाहीर स्पर्धात्मक निविदा मागवून सर्वांत उत्कृष्ट व न्यूनतम दरास ९ सप्टेंबर २०२० रोजी स्थायी समितीच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आली आहे.

पनवेल महापालिकेच्या प्रस्तावित इमारत कामाच्या अंदाजपत्रकाच्या दृष्टीने व आर्थिक उपलब्धतेनुसार काम करण्याच्या दृष्टीने दोन टप्प्यांमध्ये निविदा मागविण्यात येणार आहे. त्यानुसार प्रथम टप्प्यांमध्ये इमारतीच्या बांधकामाचा अंदाजित खर्च रक्कम १३७ कोटी रुपये आहे. दुसऱ्या टप्प्यात इंटीरियर वर्क, फर्निचर, लॅण्ड स्केपिंग, महासभागृहातील ऑडिओ व्हिज्युअल सिस्टीम व इतर सुविधा या बाबींचा अंदाजित खर्च १४३ कोटी रुपये खर्च येणार आहे. महासभेने प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिली असून लवकरच पहिल्या टप्प्यातील निविदा प्रसिद्ध होणार असल्याचेही त्यांनी नमूद करीत या प्रशासकीय इमारतीची उभारणी झाल्यानंतर राज्यातील एक आदर्श वास्तू म्हणून तिचा नावलौकिक होईल, असा विश्वासही महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी व्यक्त केला.

**“ विकासकामांच्या बाबतीत आमदार प्रशांत ठाकूर यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि पाठपुरावा मिळत असतो. त्यामुळे विकासकामांना गती मिळते. पनवेल महापालिका अस्तित्वात आल्यापासून अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प हाती घेण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख, उपमहापौर जगदिश गायकवाड, सभागृह नेते परेश ठाकूर यांचे मनपूर्वक आभार.**

**–प्रकाश बिनेदार**









भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांनी ठिकठिकाणच्या गौरा गणपतींचे दर्शन घेतले.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी




**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शनिवार, दि. २५ सप्टेंबर २०२१ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस**
**(वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी–२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी–३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी–४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. आरोग्य उपकेंद्र ६, रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. तळोजा शाळा, तळोजा गाव
- १२. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- १३. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १४. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)
- १५. श्री गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
- १६. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १७. आगरी शाळा, खांदा कॉलनी
- १८. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली
- १९. सेंट्रल रेल्वे, पनवेल

**कोवॅक्सिन**

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल

**पनवेल ग्रामीण लसीकरण**

- १. कळंबोली, कातकारवाडी फुडलँड
- २. तक्का, पमपा शाळा
- ३. रोडपाली, बौद्धवाडी
- ४. नौपाडा, रा.जि.प. शाळा

**निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता २०० व दुसऱ्या डोसकरिता १०० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.**
**(वेळ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत)**

## निवडक

### कुंडेवहाळ येथून एक जण बेपत्ता



**पनवेल :** येथील एक व्यक्ती राहत्या घरातून कोणास न सांगता निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. दत्ता रामा पाटील (वय ५०, रा. कुंडेवहाळ) असे या व्यक्तीचे नाव असून त्याचे केस काळे, मिशी जाड, रंग सावळा, उंची पाच फूट पाच इंच असून अंगात सफेद शर्ट व काळी पँट, तसेच डोक्यावर जुन्या माराची खूण व पायात चप्पल आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पोलीस नाईक ए. एस. कुंभार यांच्याकडे संपर्क साधावा.

### रेल्वेच्या धडकेत दोघांचा मृत्यू

**पनवेल :** येथील खारघर ते मानसरोवर या स्थानकांदरम्यान एका अनोळखी इसमाचा रेल्वेची धडक लागल्याने उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या इसमाचे अंदाजे वय ४० असून, उंची पाच फूट तीन इंच, बांधाने मजबूत, रंग निमगोरा, चेहरा गोल, नाक सरळ, केस काळे बारीक, अंगात काळ्या रंगाचा पिवळ्या चौकटी असलेला फूल शर्ट, काळ्या रंगाची पँट आहे. दुसऱ्या घटनेत खांदेश्वर ते पनवेलदरम्यान एका इसमाला लोकलची धडक लागल्याने त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या इसमाचे अंदाजे वय ३० असून, उंची पाच फूट पाच इंच, बांधा सडपातळ, रंग गहूवर्ण, चेहरा उभट, नाक सरळ, केस टक्कल केलेले, डोळे काळे, अंगावर एकही कपडा नाही. मयतापासून ५० फूट अंतरावर एका पिशवीत आकाशी रंगाचा शर्ट, पिवळसर टी–शर्ट, मेहंदी रंगाची फूल पँट, काळी व त्याला पांढरी पट्टी असलेली सँडल असे साहित्य मिळाले आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे फोन ०२२–२७४६७१२२, मोबाइल ७०४५२५३६७९वर संपर्क साधावा.

### बम्बईपाडा परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** तालुक्यातील बम्बईपाडा परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. या व्यक्तीचा रंग गोरा, बांधा मध्यम, केस काळे पांढरे असून, अंगात चॉकलेटी रंगाची फुल पँट आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पोलीस नाईक विष्णू गावडे यांच्याशी संपर्क साधावा.

### रेल्वे डब्यात एकाचा मृत्यू

**पनवेल :** रेल्वेस्थानकात फलाट क्र ४ वर उभ्या असलेल्या लोकलमधील लगेजच्या डब्यात एक अनोळखी इसम बेशुद्धावस्थेत सापडला. रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या इसमाचे अंदाजे वय ५० असून, उंची ५ फूट ९ इंच, अंगाने सडपातळ, रंग गहुवर्ण, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे पांढरे मध्यम, अंगात राखाडी रंगाचा हाफ शर्ट, काळ्या रंगाची पँट असे वर्णन आहे. अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे फोन ०२२–२७४६७१२२, मोबा. ७०४५२५३६७९वर संपर्क साधावा.

# अनंत गीते भंगारात काढलेले नेते

## ▮ राष्ट्रवादीचे प्रशांत पाटील यांची खरमरीत टीका

**कळंबोली : बातमीदार**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यावर जर कोणी गरळ ओकत असेल, तर ते पक्ष कदापि सहन करणार नाही. अनंत गीते हे शिवसेनेने भंगारात काढलेले नेते असून ते दोन वर्ष विजनवासात होते, अशी खरमरीत टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा रायगड जिल्ह्याचे प्रवक्ते प्रशांत पाटील यांनी कळंबोली येथे गुरुवारी (दि. २३) पत्रकार परिषदेत केली. शिवसेनेचे माजी खासदार अनंत गीते यांनी श्रीवर्धनमध्ये केलेल्या वक्तव्याचे तीव्र पडसाद जिल्ह्यात उमटत असून राष्ट्रवादीचे नेते त्यास प्रत्युत्तर देत आहेत.



कळंबोलीतील पत्रकार परिषदेस राष्ट्रवादी काँग्रेसचे पनवेल शहराचे कार्यकारी जिल्हा अध्यक्ष शिवदास कांबळे, पनवेल शहर जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष दौलत शिंदे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रशांत पाटील म्हणाले की, गीते यांनी केलेल्या वक्तव्याची त्यांच्या पक्षानेही साधी दखल घेतली नाही, तर शिवसेनेचे काही बडे नेते सुनील तटकरे यांच्याकडे लोटांगण घालून कामे करून घेत आहेत. जिल्ह्यामध्ये आघाडीचा धर्म प्रत्येकानेच पाळावा.

जिल्ह्यातील शिवसेनेचे महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे, तसेच काँग्रेसचे महेंद्र घरत यांनी जरी एकत्र येऊन राष्ट्रवादीशी मुकाबला करण्याचे ठरवले, तरी या तीन्ही महेंद्रवर राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरे निश्चितच भारी पडतील. रायगडमधील सेना व काँग्रेसच्या नेत्यांना त्यांचे वरिष्ठ निश्चितच समजूत घालण्याचा प्रयत्न करतील, असेही वक्तव्य या वेळी पत्रकार परिषदेत राष्ट्रवादीकडून करण्यात आले.

शिवसेनेच्या नेत्यांचा खरपूस समाचार घेताना आम्हीही आघाडीचा धर्म पाळून विकासाची कामे करण्यास सज्ज असल्याचे भीमसेन माळी यांनी या वेळी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वोच्च नेत्यांबद्दल कोणीही गरळ ओकत असेल, तर यापुढे त्यांची गय केली जाणार नाही. त्यांना जशास तसे उत्तर पक्षाच्या माध्यमातून दिले जाईल, असा इशारा या वेळी राष्ट्रवादीचे नगरसेवक सतीश पाटील यांनी दिला.

### सीमाशुल्कच्या ताब्यातील १० लाखांचा ऐवज लंपास


**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीटी बंदरात आयात झालेल्या मोबाइल क्सेसरीजच्या कंटेनरमधील तपासणीमध्ये सिगारेट असल्याचा संशय सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना आल्याने तो त्यांनी ताब्यात घेऊन खोपटे येथील अलकार्गो गोदामामध्ये ठेवण्यात आले होते. एक महिन्याच्या अवधीनंतर हा कंटेनर उघडला असता, त्यातील माल चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. सीमाशुल्क विभागाने दिलेल्या तक्रारीवरून उरण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ठाणे येथील एच. आर. इंटरप्राईजेसने मोबाइल क्सेसरीज आयात केली होती. त्यात चार हजार १५० किलो वजनाचे मोबाईल फोन क्सेसरीजचे एक हजार १४३ कार्टून होते. तपासणीत सीमाशुल्क अधिकाऱ्यांना सिगारेट असल्याचे आढळल्याने कंटेनर ताब्यात घेऊन खोपटे येथील ऑलकार्गो लॉजिस्टिकमध्ये ठेवण्यात आला होता, मात्र महिन्याभरात कंटेनर उघडला असता मोबाईल क्सेसरीजच्या ११४३ कार्टून बॉक्स फक्त ५०८ बॉक्स व त्यांचे वजन चार हजार १५० ऐवजी एक हजार ४६० किलो इतकेच आढळले. अधिक तपास सुरू आहे.

## दागिने चोरणारे जेरबंद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**




राज्यात सध्या सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. नवी मुंबईतही सोनसोखळी चोरट्यांचा सुळसुळाट बघायला मिळतोय, पण या घटना ताज्या असताना नवी मुंबई पोलिसांना दोन सोनसाखळी चोरट्यांना जेरबंद करण्यात यश आले आहे. या चोरट्यांनी तब्बल १८ गुन्हे केल्याचा आरोप पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून लाखो रुपयांचे सोने जप्त केले आहेत.

पहाटे मॉर्निंग वॉक करणाऱ्या वृद्धांना लक्ष्य करून सोनसाखळी चोरणाऱ्या सराईत दोन गुन्हेगारांना नवी मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. त्यापैकी एक आरोपी हा अल्पवयीन आहे. विशेष म्हणजे आरोपींना बेड्या ठोकल्याने तब्बल १८ चोरीच्या घटनांचा उलगडा झाला आहे. पोलिसांनी आरोपींकडून चार लाख ३५ हजारांचे सोने तसेच एक लाख किमतीची दुचाकी असे एकूण पाच लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलिसांनी अल्पवयीन आरोपीची बालसुधार गृहात रवानगी केली आहे, तर दुसऱ्याला ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली.

नवी मुंबई पोलिसांच्या या तपासात एकाच आरोपीने तब्बल सहा गुन्हे केल्याचे कॅमेऱ्यात निषपन्न झाले. आरोपी हा गोवंडी परिसरात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याआधारावर वाशी टोलनाक्यावर सापळा रचला. आरोपी विजय चव्हाण आणि त्याचा अल्पवयीन सहकारी पोलिसांच्या जाळ्यात अडकला. आरोपी दीपक चव्हाण याची चौकशी केली असता त्याने आपल्या गुन्ह्यांची कबुली दिली.

## पनवेल मनपातर्फे महिलांसाठी विशेष प्रशिक्षण योजना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिकेतर्फे महिला बालकल्याण विभागांतर्गत प्रशिक्षण आणि मुलींसाठी योजना सुरू करण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रशिक्षणांतर्गत महिलांना व मुलींना शिवणकाम, ब्युटिशन, फॅन्सी बॅग, पेपरच्या पिशव्या तयार करणे, बेकिंग प्रॉडक्ट, केक तयार करणे असे व्यवसाय प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याचबरोबर राज्य व राष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या मुलींना आर्थिक साहाय्य म्हणून राज्य स्तरावर १५ मुलींना १०,००० रुपये, राष्ट्रीय स्तरावर २५,००० रुपये, तसेच राज्य स्तरावर १० महिलांना २५,००० रुपये व राष्ट्रीय स्तरावर ५०,००० रुपये असे अनुदान देण्यात



येणार आहे.

वैयक्तिक शिक्षण घेणाऱ्या मुलींना प्रोत्साहनात्मक शिष्यवृत्ती एमबीबीएस शिक्षण घेणाऱ्या १० महिलांकरिता एक लाख रुपये, तसेच बीएएमएस, बीएचएमएस, बीडीएस पाच महिलांकरिता ५०,००० रुपये. त्याचबरोबर अनाथ निराधार मुलांना दत्तक घेतलेल्या २५ लाभार्थी पालकांसाठी प्रोत्साहनात्मक अनुदान २५,००० रुपये देण्यात येणार आहे.

पनवेल महानगरपालिकेने गरजू महिलांकरिता व मुलींकरिता या योजना सुरू केल्या आहेत. या सर्व प्रशिक्षण योजनांसाठी उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे. यासंदर्भात संपूर्ण माहिती पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातून प्राप्त होईल, तसेच योजनांचे सर्व फॉर्म या विभागामध्ये देण्यात येतील. अधिक माहितीसाठी महिला व बालकल्याण विभागाच्या सभापती मोनिका प्रकाश महानवर यांच्या सेक्टर २, हनुमान मंदिरासमोर, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण येथे असलेल्या जनसंपर्क कार्यलयात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## झोपडीच्या वादातून हल्ला; पाच जणांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

एपीएमसीतील ग्रीन पार्क झोपडपट्टीत बेकायदेशीरीत्या उभारण्यात आलेली झोपडी विकणाऱ्या इब्रान सलीम खान याने व त्याच्या पाच साथीदारांनी त्या भागातील झोपडी खरेदी केलेल्या तरुणावर व त्याच्या दोघां साथीदारांवर चाकूने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली.

या हल्ल्यात एक तरुण गंभीररीत्या जखमी झाला असून त्याला सायन येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर एपीएमसी पोलिसांनी सहा हल्लेखोरांविरोधात प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्यापैकी पाच जणांना अटक केली आहे.

मानखुर्द येथील आतिकुर अनिसुर शेख (२५) याने तुर्भे सेक्टर १९ मधील ग्रीन पार्क येथे राहाणाऱ्या इब्रान सलीम खान (३२) याच्याकडून ग्रीन पार्क येथे असलेली जागा विकत घेतली व तेथे झोपडी बांधली. १५ दिवसांपूर्वी इब्रान याने आतिकुर याला फोन करून त्याचे ग्रीन पार्क येथील झोपडे त्याच्या बहिणीला रहाण्यासाठी देण्याची मागणी केली, मात्र आतिकुर याने त्याला आपले झोपडे देण्यास नकार दिल्याने, इब्रान याने आरोपी चंद्रिका राजभर (१९), चंदन राजभर (२१), सूरज, कालिया व अन्य एकासह त्याला लाकडी बांबूने मारहाण केली. पोलिसांकडून फरारी असलेल्या एकाचा शोध सुरू आहे.



हरेश्वर म्हात्रे केळवणे पाडा, पनवेल



मोठेघरचा राजा, जिते, पेण



भाजप अध्यक्ष राजेश पाटील, दिघोडे, उरण



भाजप सरपंच सोनिया मयूर घरत, दिघोडे, उरण





पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी चिंचवण येथील संतोष घरत यांच्या आणि सुकापूर येथील ज्ञानेश्वर पाटील यांच्या गौरा गणपतीचे दर्शन घेतले. या वेळी के. सी. पाटील, भूपेंद्र पाटील, आनंद ढवळे, मयूर कदम आदी उपस्थित होते.


### गौरा गणपती दर्शन



पनवेल : भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष राकेश गायकवाड यांच्या घरातील ओवळ्याचा राजा.



नितीन शेडगे, दिघाटी, पनवेल



नूतन कुलदीप नाईक(सरपंच) कळंबुसरे, उरण



पनवेल : कामगार नेते सुरेश पाटील यांनी सुकापूर येथील गणेश पाटील यांच्या गौरा गणपतीचे सपत्नीक दर्शन घेतले.



मच्छिंद्र सुरेश म्हात्रे, पाले, उरण.



खारघर : नगरसेवक शत्रुघ्न काकडे त्यांच्या निवासस्थानी विराजमान गौरा गणपतीचे भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस व खारघरचे संपर्कप्रमुख दीपक बेहेरे, मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक रामजी बेरा, सरचिटणीस दीपक शिंदे, सोशल मीडिया संयोजक अजय माळी, सामाजिक कार्यकर्ते विजय भोसले यांनी दर्शन घेतले.

## संपादकीय

# शाळेची घंटा वाजणार

गेले १८ महिने बंद असलेल्या शाळांची घंटा ४ ऑक्टोबरपासून पुन्हा एकदा घणघणू लागणार आहे. सुनसान पडलेली शाळांची आवारे पुन्हा एकदा बाळगोपाळांच्या किलबिलाटाने गजबजून जाणार आहेत. जवळपास दीड वर्षाहून अधिक काळ घरामध्ये बसून ऑनलाइन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीवर्गाला पुन्हा एकदा गणवेश चढवून शाळेतील प्रत्यक्ष शिक्षणाची मौज अनुभवता येणार आहे. पुरेसा गोंधळ घालून झाल्यानंतर आणि शिक्षणक्षेत्राचा पुरता खेळखंडोबा केल्यानंतर आता कुठे राज्यातील सरकारला विद्यार्थ्यांच्या भविष्याची काळजी वाटू लागली हे विशेष आहे.

**शाळा नेमक्या कधी सुरू करायच्या या एका प्रश्नाबाबत राज्यातील महाविकास आघाडी सरकारने गेले काही महिने यथेच्छ घोळ घातला आहे. असे असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिवाळीच्या आधीच शाळा सुरू करण्याचा निर्णय जाहीर केल्याने लाखो पालक बुचकळ्यात पडले असल्याची शक्यता आहे. कारण कुठलाही निर्णय घेताना ताक फुंकून पिणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी एवढा मोठा निर्णय घेतला हे एका अर्थी धाडसच म्हणायला हवे. एका सर्वेक्षणात मध्यंतरी दिसून आले होते की ६७ टक्के पालकांना आता शाळा लवकरात लवकर सुरू व्हाव्यात असे वाटते. ऑनलाइन शिक्षणाचा अजूनही तितकासा प्रभाव जाणवत नाही हे शिक्षण खात्याला उशिरा का होईना कळून चुकले ही स्वागतार्ह बाबच म्हटली पाहिजे. ऑनलाइन शिक्षणाला निदान आपल्या देशात तरी अजूनही अनेक मर्यादा आहेत. ऑनलाइन शिक्षणासाठी इंटरनेटची व्यवस्था सर्वदूर पसरलेली आणि सशक्त असावी लागते तसेच त्यासाठी लागणारी मोबाइल, लॅपटॉप, किंवा मोडेम यांसारखी तांत्रिक साधने मुबलक प्रमाणात उपलब्ध असावी लागतात. प्रगत देशांमध्ये या सुविधा सहज उपलब्ध होऊ शकतात, परंतु आपला देश आता कुठे विकासाच्या भराऱ्या मारण्याची स्वप्ने पाहू लागला आहे. इतकी वर्षे अशी स्वप्ने पाहणेदेखील आपल्याला परवडण्यासारखे नव्हते. याशिवाय शाळेतील बाकांवर मिळणाऱ्या प्रत्यक्ष शिक्षणाची ऑनलाइन पद्धतीशी तुलनाच होऊ शकत नाही. शाळेमध्ये फक्त विद्यार्जन नव्हे; तर विद्यार्थीवर्गास सामाजिक भानदेखील मिळवता येते. त्यामुळे आणखी सुमारे दोन आठवड्यांनंतर शाळा सुरू होणार या बातमीचे सर्वच जण स्वागत करतील. ग्रामीण भागामध्ये पाचवी ते बारावी आणि शहरी भागामध्ये आठवी ते बारावी असे वर्ग ४ ऑक्टोबरपासून सुरू होतील. अर्थात, कोरोना प्रतिबंधक नियमांची काटेकोर अंमलबजावणी केल्यानंतरच या शाळा सुरू होऊ शकणार आहेत. त्यासाठी सरकारनेच विशेष कोरोना नियमावली जाहीर केली असून शाळेमध्ये एक विद्यार्थी जरी कोरोनाने बाधित झालेला आढळला तरी शाळा ताबडतोब बंद करण्याच्या सूचना सरकारने दिल्या आहेत. एका बाकावर एकच विद्यार्थी बसेल. विद्यार्थ्यांच्या पालकांनी शाळेच्या आवारात गर्दी करू नये. पटसंख्या जास्त असल्यास दोन सत्रांमध्ये शाळा सुरू ठेवावी अशा प्रकारचे नियम घालून देण्यात आले आहेत. महाविद्यालये मात्र इतक्यात सुरू होणार नाहीत असे दिसते. ती टप्प्याटप्प्यानेच सुरू करावीत असा सरकारचा विचार आहे. शाळांच्या संदर्भात सरकारी नियमावली काही पालकांना जिकिरीची वाटू शकेल, परंतु सुरुवातीला तरी एवढी काळजी घेणे आवश्यकच आहे. शाळांच्या चालकांना पूर्वतयारीसाठी थोडा अधिक वेळ द्यायला हवा होता हे मात्र खरे. कारण अवघ्या दहा दिवसांमध्ये शाळा सुरू करण्याची तयारी करणे अनेक शिक्षण संस्थांना कठीण जाणार आहे.**

# अतिवृष्टीमुळे मुरूड तालुक्याची वाताहत





मुरूड तालुक्यात आतापर्यंत ३७६९ मिमी एवढा प्रचंड पाऊस झाल्याने संपूर्ण तालुक्याला यामुळे मोठी हानी सहन करावी लागली आहे. ग्रामीण व शहरातील रस्त्यांची दैना उडाली असून मुंबई शहराला जोडणाऱ्या पुलांचासुद्धा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. काशीद येथील पूल वाहून गेल्याने अलिबाग-मुरूड येथील वाहतूक तब्बल २० दिवस बंद ठेवण्यात आली होती. त्यामुळे एसटी आगाराचे दिवसाला साडेतीन लाख रुपयांचे नुकसान झाले होते.

**रस्त्यांची चाळण**

मुरूड तालुक्यात जुलै महिन्यात एका दिवसाला ३५३ मिमी व तद्नंतर सप्टेंबर महिन्याच्या ८ तारखेला एका दिवसात ४७५ मिमी एवढा प्रचंड पाऊस झाला. सततच्या पावसामुळे नदीकाठच्या व डोंगर भागात राहणाऱ्या लोकांना इतर ठिकाणी हलविण्यात आले होते, त्यामुळे जीवितहानी टळली. मात्र तालुक्यातील रस्ते व पुलांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. सर्वसाधारणपणे श्रावण महिन्यात पावसाचे प्रमाण कमी होते, परंतु यंदा या महिन्यातसुद्धा मुसळधार पाऊस बरसल्याने तालुक्यात सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. सर्व शेती पाण्याखाली गेली होती. पाण्याच्या प्रचंड वेगामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांचा भराव वाहून गेला, तर काही ठिकाणी रस्तेच खचले. मोठमोठे खड्डे पडून तालुक्यातील सर्वच रस्त्यांची चाळण झाली आहे.

मुरूड तालुक्यातील उसरोली टेप ते उसरोली गाव या रस्त्याचा डाव्या बाजूकडील दगडी भराव पाण्याच्या माऱ्यामुळे वाहून गेला असून तेथे फक्त आता मातीचा थर राहिला आहे. त्यामुळे हा रस्ता लवकरात लवकर करण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अतिवृष्टीमुळे तालुक्यातील रस्ते नादुरुस्त झाले असून पाऊस थांबताच सार्वजनिक बांधकाम खात्याने या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करावी, अशी मागणी सर्व स्तरातून करण्यात येत आहे.



अतिवृष्टीमुळे मुरूड तालुक्यातील रस्त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्याची माहिती वरिष्ठ कार्यालयाला देण्यात आली आहे, तसेच रस्ते दुरुस्तीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे निधीची मागणी करण्यात आली आहे. निधी प्राप्त होताच या कामाला सुरुवात करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम खात्याचे मुरूड येथील उपअभियंता एस. गणगणे यांनी दिली.

**खबरबात**
**संजय करडे**

मुरूड शहरालासुद्धा अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. जुनी पेठ ते दस्तुरीनाका हा रस्ता एवढा खड्डेमय झाला आहे की या रस्त्यावर नेहमीच छोटेमोठे अपघात होत असतात. शहरातील गावदेवी पाखाडी, सबनीस आळी, शेगवाडा, भोगेश्वर पाखाडी आदी भागातील रस्तेसुद्धा खड्डेमय झाले असून नगर परिषदेकडून त्यांची दुरुस्ती होत नसल्याने नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत.

**पूल झाले धोकादायक**

मुंबई-मुरूडला जोडणाऱ्या मुख्य रस्त्यावरील चिकणी पुलाच्या पुढील भागातील भराव वाहून गेल्यामुळे तेथे केवळ अर्धा अधिक रस्ता उरला आहे. काही दिवसापूर्वीच विहूर पुलाची दुरुस्ती करण्यात आली होती. नेमकी तीच बाजू अतिवृष्टीत वाहून गेल्याने या पुलाच्या डाव्या बाजूला मोठा खड्डा पडला आहे. या पुलावरून केवळ उजव्या बाजूने वाहतूक सुरू आहे. या पुलाचे काम जलद गतीने होणे खूप आवश्यक आहे अन्यथा पावसामुळे येथील खड्डा मोठा होत जाईल व हा पूल वाहतुकीस बंद करावा लागेल. तसे झाल्यास मुरूडचा मुंबई, अलिबाग बरोबरचा संपर्क तुटेल.

उसरोली ग्रामपंचायत हद्दीमधील अदाड गावाला जोडणारा पूल अतिवृष्टीमुळे कमकुवत झाला असून या पुलाचे संरक्षक कठडे व पुलाखालील काँक्रिट वाहून गेल्याने लोखंडी सळ्या दिसू लागल्या आहेत. या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे. या ठिकाणी नवीन पूल बांधण्याची गरज असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यासाठी शासनाकडे निधीची मागणी करण्यात आली आहे.

निधी प्राप्त होताच अदाड पुलाचे काम सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. बारदासकर यांनी दिली.

**मच्छीमारांचेही नुकसान**

एकदरा पुलाजवळ मच्छीमार आपल्या बोटी दोरखंडाने बांधून ठेवतात, परंतु रात्रीच्या वेळी पावसाचा वेग वाढल्याने एकदरा खाडीतील पाण्याचा प्रवाह एवढा वाढला की चार बोटींचे दोरखंड तुटले. त्यामुळे दोन बोटींना जलसमाधी मिळाली, तर दोन बोटी महत्प्रयासाने किनाऱ्यावर आणण्यात यश मिळाले, मात्र धनंजय पद्माकर पाटील यांची मोठी बोट आणि संजय जंजीरकर यांची तीन सिलिंडरवाली बोट बुडाल्याने त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

तालुक्यातील नुकसान झालेल्या बोटींचे पंचनामे करण्यात आले आहेत. नुकसानीचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यात आला असून संबंधित मच्छीमारांना नुकसानभरपाई देण्यात येणार असल्याचे मुरूड तालुक्याचे मत्स्यविकास व परवाना अधिकारी तुषार वाळुंज यांनी सांगितले.

# युनिसेफ, सीएसीआर संस्थांची पूरग्रस्तांना मदत

**माणगाव : प्रतिनिधी**

युनिसेफ आणि सीएसीआर या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने महाड तालुक्यातील काळीज आदिवासीवाडीमधील पूरबाधित कुटुंबांना नुकताच हायजिन किट आणि ताडपत्रीचे वाटप करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांनाही शालोपयोगी साहित्य देण्यात आले.

बॅक टू होम ही संकल्पना घेऊन युनिसेफ आणि सीएसीआर या संस्थांनी महाड आणि पोलादपूर तालुक्यातील पूरग्रस्तांसाठी पुन्हा एकदा मदतकार्य सुरू केले आहे. त्याची सुरुवात सोमवारी महाडचे तहसीलदार सुरेश काशीद यांच्या प्रमुख उपस्थितीत काळीज आदिवासीवाडी येथे करण्यात आली. या कार्यक्रमात प्रत्येक बाधित कुटुंबाला हायजिन किट आणि ताडपत्रीचे वाटप करण्यात आले. शाळकरी मुलांना वह्या, पुस्तके, दप्तर आणि इतर शिक्षणोपयोगी वस्तू देण्यात आल्या, तसेच परिसरातील आंगणवाडी आणि शाळांना चित्रकलेचे साहित्य आणि वेगवेगळ्या खेळांच्या सामानाचेदेखील वाटप करण्यात आले.

या वेळी युनिसेफच्या प्रतिनिधी अपर्णा कुलकर्णी, सीएसीआरचे नितीन वाधवानी, सुवर्णा घाडगे आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते.

(छाया : सलीम शेख)





युनिसेफ आणि सीएसीआर या संस्थांतर्फे आतापर्यंत महाड तालुक्यातील काळीज आदिवासीवाडी, आसनपोई बौद्धवाडी आणि दादली गावांमधील २०० पेक्षा जास्त पूरबाधित कुटुंबांना मदत करण्यात आली आहे. पुढील दिवसात ३०-४० गावांत हे मदतकार्य करण्यात येणार आहे. आई कनकाई सामाजिक संस्था (माणगाव) आणि हरित क्रांती संघटना (महाड) यांचे या उपक्रमासाठी योगदान मिळत आहे. संस्थेचे सुशील कदम, संघटनेचे राजेंद्र कडू आणि त्यांचे सहकारी या भागातील पूरग्रस्तांविषयी माहिती गोळा करून प्रत्येक गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहचविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

# रोह्यात महिला बचत गटांना मार्गदर्शन

(छाया : जितेंद्र जाधव)



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रोठ ब्रुदुक ग्रामपंचायत आणि बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने रोठ ब्रुदुक गावातील महिला बचत गटांसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. बँकेचे शाखा व्यवस्थापक चित्तरंजन कुमार यांनी या शिबिरात विविध योजनांची माहिती दिली.

रोठ ब्रुदुक गावातील बचत गटांच्या महिला प्रतिनिधी या शिबिरात सहभागी झाल्या होत्या. त्यांना बँकेचे शाखा व्यवस्थापक चित्तरंजन कुमार यांनी जनधन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना, अटल पेशन योजना आदी योजनांविषयी माहिती दिली.

येत्या काही दिवसांत धाटाव पंचक्रोशीतील ३० बचत गटांतील महिलांसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित घाग यांनी या वेळी दिली. रोठ ब्रुदुकचे सरपंच नितीन वारंगे, राजेश डाके, राजेश भगत, विलास डाके, सुशिल वारंगे, ग्रामसेविका अलका बामगुडे यांच्यासह गावातील महिला व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# सुधागडातील वावळोलीत ग्रामसफाई मोहीम

(छाया : धम्मशील सावंत)





**पाली : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सिद्धेश्वर (ता. सुधागड) ग्रामपंचायत हद्दीतील वावळोली येथे ग्रामसफाई मोहीम राबविण्यात आली. या वेळी उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांनी स्वच्छतेची प्रतिज्ञा घेतली.

पंचायत समिती सुधागड, ग्रामपंचायत सिद्धेश्वर, प्राइड इंडिया व सुकन्या ग्रामसंघ यांच्या संयुक्तवतीने ही ग्रामसफाई मोहीम राबविण्यात आली. या वेळी तहसीलदार दिलीप रायण्णावार, गटविकास अधिकारी विजय यादव, कृषी अधिकारी अशोक महामुनी, एमआरएलएमच्या अनुराधा गायकवाड, प्राईड इंडियाचे प्रकल्प व्यवस्थापक वसंत मोरे, ग्रामसेवक ए. टी. गोरड,

**ग्रामस्थांनी घेतली स्वच्छतेची प्रतिज्ञा**

सुकन्या ग्रामसंघाच्या अध्यक्षा प्राजक्ता यादव, पोलीस पाटील सुधीर महाले, ग्रामपंचायत सदस्या संजना फाळे, रजनी जाधव उपस्थित होते. महिला व ग्रामस्थांबरोबर सर्व अधिकारी स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते.

प्राइड इंडियाच्या रोशना महाले, सचिन मुंढे, गणेश महाले, विजय महाले, स्नेहा यादव, प्राची कदम, मयूरी महाले यांच्यासह वावळोली ग्रामस्थ आणि महिला यांनी ही ग्रामसफाई मोहीम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# रोह्यातील चिंचवली शाळेत भरले रानभाज्यांचे प्रदर्शन



(छाया : [illegible])

**रोहे : प्रतिनिधी**

राष्ट्रीय पोषण आहार महासप्ताहानिमित्त रोहा तालुक्यातील चिंचवली तर्फे आतोणे येथील प्राथमिक शाळेत शुक्रवारी (दि. २४) रानभाज्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. चिंचवली आदिवासीवाडीतील मुलांनी पालकांसोबत जंगलात जाऊन रानभाज्या आणल्या व या प्रदर्शनात सहभाग नोंदवला होता.

या प्रदर्शनात तेरी, अळू, माट, लाल माट, कोहळ, टाकळा, भवरीचे पाने, कुरडू आदी रानभाज्या ठेवण्यात आल्या होत्या. मुलांनी या रानभाज्याचे महत्त्व सांगितले. या भाज्या कशाप्रकारे उपयुक्त असतात, याबद्दल पालकांनी माहिती दिली.

शाळेचे मुख्याध्यापक गजानन जाधव, उपशिक्षिका हर्षा काळे, अंगणवाडी सेविका कल्पना बुरुमकर यांनी या रानभाज्या प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या वेळी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, महिला पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# पेणमध्ये आज लोकन्यायालय

**पेण : प्रतिनिधी**

येथील दिवाणी न्यायालयात शनिवार (दि. २५) लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे.



(छाया : अनिस मनियार)

वादपूर्व खटले, पाणीपट्टी, घरपट्टी, वीज बिलवसुली, दूरध्वनी देयक वसुली, दिवाणी दावे, फौजदारी खटले तडजोडीने निकाली होण्यासाठी या लोकन्यायालयामध्ये ठेवण्यात आले आहेत.

या लोकन्यायालयाच्या नियोजनासंदर्भात पेण येथील दिवाणी न्यायालयालयात संबधीतांची बैठक झाली. पेण बार असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. एन. एन. म्हात्रे, सरकारी वकील अ‍ॅड. सतीश नाईक व वर्षा म्हात्रे, तसेच अन्य वकील, न्यायालयीन कर्मचारी व न्यायालयात हजर असलेले पक्षकार उपस्थित होते.

लोकन्यायालयात सहभाग घेऊन जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी पक्षकारांनी हजर राहावे, असे आवाहन दिवाणी न्यायाधीश आर. एन. मुजावर, सहदिवाणी न्यायाधीश पी. सी. देशपांडे यांनी केले आहे.

# विजय इस्टेटविरोधात गुन्हा दाखल

## १२०० सदनिकाधारकांच्या फसवणुकीचा आरोप

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील वाकस येथे १०० एकर जमिनीवर उभ्या राहत असलेल्या विजय इस्टेट या गृहसंकुलात सदनिका बुक करणाऱ्या शेकडो ग्राहकांची फसवणूक झाली आहे. त्यातील काही ग्राहकांनी तक्रार दिल्यानंतर नेरळ पोलीस ठाण्यात विजय इस्टेट ग्रुपचे मालक अतीव गाला यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

कर्जत तालुक्यातील वाकस येथे विजय ग्रुपकडून १०० एकर जमिनीवर गृहप्रकल्प विकसित केला होता. त्याबद्दलची जाहिरात बघून डॉ. गजानन विनायक कागलकर (वय ४४, रा. मानखुर्द, मुंबई) यांनी २०१७ मध्ये विजय ग्रुपचे सुनील सोनी यांच्याशी चर्चा करून या गृहप्रकल्पातील एक सदनिका बुक केली आणि अनामत रक्कम ९९९९ रुपये दिली. त्यानंतर कर्जत सबरजिस्टर कार्यालयात २३ ऑगस्ट २०१७ रोजी डॉ. कागलकर यांच्या नावे त्या सदनिकेची नोंदणीदेखील झाली. मात्र २०१८ मध्ये या गृहप्रकल्पाचे काम बंद झाले.

(छाया : संतोष पेरणे)






त्यानंतर विजय इस्टेटमध्ये बुक केलेल्या अनेक सदनिकाधारकांनी मुंबई चर्चगेट येथील रेरा कार्यालयात तक्रारी नोंदविल्या असून, रेरा न्यायालयाने विजय ग्रुप हौसिंग लिमिटेडचे संचालक अतीव गाला यांना संबंधित सर्व सदनिकाधारकांना घरे देण्यात यावीत किंवा त्यांनी दिलेली रक्कम व्याजासह परत करावी, असे लेखी आदेश दिले होते, मात्र मागील वर्षभरात विजय ग्रुप हौसिंग लिमिटेडकडून कोणत्याही सदनिकाधारकाला व्याजासह रक्कम किंवा सदनिका देण्यात आलेली नाही. त्यामुळे डॉ. गजानन कागलकर यांनी एप्रिल २०२१ मध्ये नेरळ पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली होती. त्याची खातरजमा करून विजय ग्रुप हौसिंग लिमिटेडचे मालक अतीव गाला यांच्या विरोधात नेरळ पोलीस ठाण्यात १८ सप्टेंबर २०२१ रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास प्रभारी निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर करीत आहेत.

***विजय इस्टेटच्या वाकस येथील गृहप्रकल्पात ८००० सदनिका बांधल्या जाणार होत्या. त्यातील सुमारे १२०० घरांची बुकिंग झाली होती, मात्र २०१८ पासून तेथील सर्व कामे बंद आहेत. येथे घरांची बुकिंग करणाऱ्या सर्वांची फसवणूक झाली आहे. त्यामुळे हा जमीन घोटाळा शेकडो कोटींचा असावा आसा तर्क बांधला जात आहे.***

**“ विजय इस्टेट या गृहप्रकल्पात सदनिका नोंद करणाऱ्या जास्तीत जास्त ग्राहकांनी आपल्या तक्रारी द्याव्यात. त्याचा फायदा पोलीस तपासात होईल आणि सर्वांना न्याय देता येईल.**
**–राजेंद्र तेंडुलकर, प्रभारी अधिकारी, नेरळ पोलीस ठाणे**

## बोगस मालक दाखवून जमिनीची खरेदी

### आरोपीला नेरळ पोलिसांकडून अटक

**कर्जत : बातमीदार**

मृत शेतकऱ्याच्या नावावर असलेली जमीन बोगस मालक दाखवून खोट्या खरेदीखताच्या आधारे खरेदी करणाऱ्या तरुणाला नेरळ पोलिसांनी अटक केली आहे.

कर्जत तालुक्यातील माणगाव येथील आठ गुंठे क्षेत्र असलेली जमीन आसल येथील संदीप राजाराम गायकवाड या तरुणाने बोगस मालकाकडून खरेदी केली. त्याला नेरळ पोलिसांनी ताब्यात घेतले असून न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

मुंबईतील महंमद अफाक इसाक अन्सारी यांच्या वडिलांच्या नावे माणगाव (ता. कर्जत) ग्रामपंचायत हद्दीत आठ गुंठे (सर्व्हे नंबर ८३/४) जमीन आहे. या जमिनीचे मूळ मालक २०११ साली मृत झाले आहेत. त्यांच्या जागी बोगस मालक दाखवून संदीप गायकवाड (रा. आसल, ता. कर्जत) यांनी विकत घेतली. २६ फेब्रुवारी २०२१ रोजी संदीप गायकवाड यांनी कर्जत येथील दुय्यम निबंधक कार्यालय येथे सदर जमिनीचा खरेदी व्यवहार पूर्ण केला. त्यानंतर जमिनीची नोंद करण्यात येत असताना या जमिनीचे मूळ मालक महंमद अफाक इसाक अन्सारी यांनी आपली फसवणूक केल्याची तक्रार नेरळ पोलीस ठाण्यात दाखल केली होती.

**कर्जत तालुक्यात आणखी एक जमीन घोटाळा उघड**

याप्रकरणी संदीप राजाराम गायकवाड यास अटक करण्यात आली असून, कर्जत न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्यातील अन्य आरोपींचा शोध नेरळ पोलीस घेत आहेत. अधिक तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गणेश गिरी करीत आहेत.



**पेण : अष्टविनायक मित्र मंडळ धूळवड झोतीरपाडा यांच्या वतीने साखरचौथ गणपती प्रतिष्ठापना करण्यात आली असून तेथे दर्शन घेताना मंडळाचे पदाधिकारी व ग्रामस्थ.** (छाया : धम्मशील सावंत)

## चाकूचा धाक दाखवून चोरी करणाऱ्यास कर्जतमध्ये बेड्या

**कर्जत : प्रतिनिधी**

(छाया : विजय मांडे)



चाकूचा धाक दाखवून रोख रक्कम, पॅनकार्ड, एटीएम कार्ड असा ऐवज बळजबरीने चोरणाऱ्या चोराला कर्जत पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अधिक तपासात त्याच्यावर कल्याण रेल्वे पोलीस ठाण्यात सहा गुन्हे नोंद असल्याची माहिती उघडकीस आली आहे.

कर्जत भिसेगाव येथील संतोष अरुण भोसले (वय ४०) हे पहाटे नोकरीनिमित्त मुंबईकडे जात असताना कर्जत रेल्वे स्टेशनच्या तिकीट घराजवळ अज्ञात इसमाने चाकूचा धाक दाखवून त्यांच्याजवळील रोख रक्कम, पॅनकार्ड, एटीएम कार्ड असा ऐवज बळजबरीने चोरून नेला होता. त्याबाबत संतोष भोसले यांनी कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

कर्जत पोलीस ठाण्याच्या निरीक्षक सुवर्णा पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक राजू आल्हाट, उपनिरीक्षक महेश धोंडे, अंमलदार सुभाष पाटील, भूषण चौधरी, गणेश पाटील, अश्रूबा बेंद्रे, हवालदार स्वप्नील येरूणकर यांच्या पथकाने गुन्ह्याचा तपास सुरू केला.

चोरट्याच्या वर्णनावरून पोलीस अंमलदार भूषण चौधरी यांनी खबऱ्याकडून अज्ञात चोरट्याची माहिती घेतली आणि सदर गुन्ह्यातील संशयित इसम रोहित लालता गौतम ऊर्फ याकूब (वय २३, रा. क्रांतीनगर, भिसेगाव, कर्जत) याला गुन्हे प्रकटीकरण विभागाच्या पथकाने एक तासाच्या आत ताब्यात घेतले. अधिक तपासात त्याच्यावर कल्याण रेल्वे पोलीस ठाण्यात सहा गुन्हे दाखल असल्याचे आढळून आले.

## श्रीवर्धनमध्ये मास्कचे वाटप

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोरोना महामारीत फ्रंट लाईन वॉरियर्स म्हणून काम करणाऱ्या पत्रकारांना श्रीवर्धन महसूल विभागाकडून प्रभारी तहसीलदार रामभाऊ गिरी यांच्या हस्ते मास्कचे वाटप करण्यात आले.

श्रीवर्धन तहसील कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत चोगले, पत्रकार सेवा संघाचे अध्यक्ष रामचंद्र घोडमोडे, मकसूद नजीरी, मंडळ निरीक्षक देऊळगावकर यांच्यासह पत्रकार मित्र या वेळी उपस्थित होते.



**पोलीस लाईन बॉईजचा राजा, अलिबाग**



**श्रीबाग नागरिक सेवा संघटना श्रीबाग नं. २ सार्वजनिक साखर चौथ गणेशोत्सव, अलिबाग**

## खालापूर विभागीय पोलीस अधीक्षक कार्यालयात कोरोनाचा शिरकाव

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली, खालापुरातील कोरोना रुग्णसंख्या शून्यावर आली असतानाच गुरुवारी (दि. २३) कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणाऱ्या खालापूर उपविभाग पोलीस कार्यालयात कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळल्याने हे कार्यालय बंद करण्यात आले, मात्र त्याची अधिकृत माहिती मिळवण्यासाठी कार्यालयात दूरध्वनी केला असता संपर्क होऊ शकला नाही.




खाजगी लॅबमध्ये केलेल्या तपासणीत बुधवारी खालापूर विभागीय पोलीस कार्यालयातील दोन कर्मचारी कोरोना पॉझिटिव्ह आढळले होते. त्यांची व इतर पोलीस कर्मचाऱ्यांची पुन्हा खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात तपासणी करण्यात आली असल्याची माहिती खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. निमिष धंडे यांनी दिली.



खालापूर विभागीय पोलीस कार्यालयातील तीन कर्मचारी पॉझिटिव्ह आढळण्याची शक्यता आहे. त्याचा येथील कामकाजावर परिणाम झाला आहे, मात्र कार्यालय सुरू असल्याचे कार्यालयीन प्रमुख पोलीस हेडकॉन्स्टेबल भानुदास कराळे यांनी सांगितले.

याबाबत माहिती घेण्यासाठी खालापूर तालुका आरोग्य अधिकारी प्रसाद रोकडे यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी आपला भ्रमणध्वनी न उचलण्याचे सौजन्य दाखवले.

दरम्यान, तालुक्याची कोरोना मुक्तीकडे वाटचाल सुरू असतानाच खालापुरातील सर्व शासकीय कार्यालयात कोरोनाविषयक नियम धाब्यावर बसविण्यात येत असल्याचे चित्र आहे.


**श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर**
प्रधान कार्यालय : वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.
फोन नं. ०२३२८–२२४२८६/८७

**✲ जाहीर प्रकटन ✲**
**पनवेल नवी मुंबई शाखा स्थलांतर**

श्री वारणा सहकारी बँक लि., शाखा पनवेल नवी मुंबईच्या सर्व सभासद, ग्राहक व हितचिंतक यांना कळविणेत येते की, रविवार दि. २६/१०/२०२१ पासून बँकेची पनवेल नवी मुंबई शाखेचे स्थलांतर **शॉप नं. १, 'सी' विंग, सुवर्ण पुष्प सोसायटी, टिळक रोड, जयभारत नाक्याजवळ, ओल्ड पनवेल, ता. पनवेल, जिल्हा रायगड– ४१०२०६** या जागेत होत आहे. तरी ग्राहकांना विनंती करणेत येते की, दि. २६/१०/२०२१ पासून सर्व बँकींग व्यवहार वरील पत्त्यावरील शाखेतून करावे.

**सही/–**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**


## रायगड जिल्ह्यात गौरा गणपतींचे आगमन

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यात अनंतचतुर्दशीला गणेशोत्सवाची सांगता झाली असली तरी रायगड जिल्ह्यात शुक्रवारी (दि. २४) साखरचौथीच्या म्हणजेच गौरा गणपतींचे आगमन झाले. दीड दिवसांच्या मुक्कामानंतर शनिवारी (दि. २५) या गणपतीना निरोप दिला जाईल.


गौरा गणपातीची प्रथा फक्त रायगड जिल्ह्यातच आहे. रायगड जिल्ह्याच्या उत्तर भागात हा साखरचौथ गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. अनंत चतुर्दशीनंतर येणाऱ्या पहिल्या संकष्टी चतुर्थीच्या दिवशी या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाते. याला गौरा गणपती असेही म्हटले जाते. रायगड जिल्ह्यात पेण, पनवेल, उरण, कर्जत, अलिबाग या तालुक्यांमध्ये हा उत्सव साजरा केला जात असे आता दक्षिण रायगडातदेखील हा उत्सव साजरा केला जाऊ लागला आहे.

पितृपक्षात साजरा होणारा हा एकमेव उत्सव आहे. घरगुती आणि सार्वजनिक अशा दोन्ही स्वरूपात हा उत्सव साजरा होतो. या वर्षी ७३१ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. गणेश चतुर्थीला आलेल्या २१ दिवसांच्या गणपतींचा काही ठिकाणी अजूनही मुक्काम आहे. असे असतानाच शुक्रवारी या गौरा गणपतींचे आगमन झाले.

गौरा गणेशोत्सव कसा सुरू झाला याचा नेमका उल्लेख सापडत नाही, परंतु त्याबाबत काही आख्यायिका सांगितल्या जातात. गणेश कार्यशाळामध्ये गणेश चतुर्थीच्या दिवसापर्यंत काम चालत असते. त्यामुळे या कारागिरांना गणेशोत्सव साजरा करता येत नाही. म्हणून साखरचौथीच्या गणेशोत्सवाला सुरुवात झाल्याचे काही जण सांगतात.

काहीच्या मते कोकणात घरगुती गणेशोत्सव साजरा होत असतो. तेथील भक्तांना सार्वजनिक गणेशोत्सवाचा आनंद लुटता येत नाही. ही संधी सर्वांना मिळावी या हेतूने या उत्सवाची सुरुवात झाली.

(छाया : संजय करडे)



## नांदगाव हायस्कूलमध्ये पंचक्रोशीच्या राजाचे स्वागत

**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यातील नांदगाव येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयात शुक्रवारी (दि. २४) पंचक्रोशीच्या राजाचे आगमन झाले. या वेळी साखरचौथ गणपतीचे हर्षोल्हासात स्वागत करण्यात आले.

गणरायांच्या पूजेचा मान विद्यालयाचे प्रयोगशाळा सहाय्यक संतोष बुल्लू व त्यांच्या पत्नीला मिळाला. शैलेश जोशी यांनी पौरोहित्य केले. मुख्याध्यापक चिंतामणी जोशी, पर्यवेक्षक उत्तमराव वाघमोडे, प्रतीक पेडणेकर, सागर राऊत, दत्तात्रेय खुळपे, अर्चना खोत, रेखा बोरजी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी आरती व भजनाचे कार्यक्रम झाले. या वेळी कोरोनाविषयक नियमांचे पालन करण्यात आले.



**चेंढरे, अलिबाग**



**ठिकरूळ नाका मित्र मंडळ, अलिबाग**



**युवा बापदेव मित्रमंडळाचा कुरुळचा राजा, अलिबाग**



**भाजी मार्केट, अलिबाग**


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-Tender Notice**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

| Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-9/21-22 (RFX No. 7000020661) | | | Period for submission of E-Bid: 23.09.2021 to 30.09.2021 up to 23:59hrs | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name of Work: AMC for Split ACs installed at 400kV R.S. (O&M) Division, Kharghar** | | | | | |
| **Estimated Cost** | **EMD (Rs.)** | **Tender Fee (Rs.)** | **Closing Date** | **Technical Opening Date** | **Commercial Opening Date** |
| Rs. 5,00,000/- (Including GST) | Rs. 5,000/- | Rs.525/- (Including GST) | **30.09.2021** up to 23:59 hrs | **01.10.2021** at 10:00 hrs (If possible) | **01.10.2021** at 10:15 hrs (If possible) |

**Contact Persons:**
1) Mr. V.K.Surpatne, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9769213878
2) Ms. P.C.Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**

1] Tender document can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their Bid well in advance instead of waiting till last date.
**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**
**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - **https://srmetender.mahatransco.in.**

SD/-
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-Tender Notice**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

| Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-8/21-22 (RFX No. 7000020484) | | | Period for submission of E-Bid: 23.09.2021 to 30.09.2021 up to 23:59hrs | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name of Work: Supply and Installation of electrical point wiring in Kharghar Guest House under 400kV RS (O&M) Dn., Kharghar** | | | | | |
| **Estimated Cost** | **EMD (Rs.)** | **Tender Fee (Rs.)** | **Closing Date** | **Technical Opening Date** | **Commercial Opening Date** |
| Rs. 3,93,579.58/- (Including GST) | Rs. 5,000/- | Rs.525/- (Including GST) | **30.09.2021** up to 23:59 hrs | **01.10.2021** at 10:00 hrs (If possible) | **01.10.2021** at 10:15 hrs (If possible) |

**Contact Persons:**
1) Mr. V.K.Surpatne, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9769213878
2) Ms. P.C.Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**

1] Tender document can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their Bid well in advance instead of waiting till last date.
**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**
**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - **https://srmetender.mahatransco.in.**

SD/-
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

# आयपीएलमध्ये मुंबईची पुन्हा हाराकिरी

## कोलकाता विजयी



**अबूधाबी : वृत्तसंस्था**

राहुल त्रिपाठी (नाबाद ७४) आणि वेंकटेश अय्यर (५३) या युवा फलंदाजांच्या अर्धशतकांमुळे कोलकाता नाइट रायडर्सने गुरुवारी झालेल्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) सामन्यात मुंबई इंडियन्सवर सात गडी आणि २९ चेंडू राखून मात केली. मुंबईचा हा सलग दुसरा आणि नऊ सामन्यांत पाचवा पराभव ठरला.

अबूधाबी येथे झालेल्या या सामन्यात मुंबईने दिलेले १५६ धावांचे आव्हान कोलकाताने १५.१ षटकांत पूर्ण केले. कोलकाताचे सलामीवीर अय्यर आणि शुभमन गिल यांनी सुरुवातीपासून आक्रमक शैलीत फलंदाजी केली. या दोघांनी तीन षटकांतच ४० धावांची सलामी दिल्यावर गिलचा जसप्रीत बुमराने त्रिफळा उडवला. यानंतर अय्यर आणि त्रिपाठी यांनी कोलकाताच्या डावाची सूत्रे हाती घेत ८८ धावांची भागीदारी रचली. अय्यरने अवघ्या २५ चेंडूंत चार चौकार आणि तीन षटकारांच्या आयपीएलमधील त्याचे पहिले अर्धशतक झळकावले. त्याला ५३ धावांवर बुमराने माघारी पाठवले, मात्र त्रिपाठीने ४२ चेंडूंत आठ चौकार आणि तीन षटकारांच्या साहाय्याने नाबाद ७४ धावांची खेळी करीत कोलकाताला विजय मिळवून दिला.





पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ओवळे येथील राकेश गायकवाड यांच्या निवासस्थानी विराजमान २१ दिवसांच्या बाप्पाचे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर पाटील, युवा मोर्चा उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, सचिन लक्ष्मणशेठ पाटील, सुनील म्हात्रे, गजानन म्हात्रे, सुरेश गायकवाड, रूपेश गायकवाड, संजय गायकवाड, अमित चोरघे, रोहिदास गायकवाड, अक्षय गायकवाड, सुदर्शन म्हात्रे, राकेश गायकवाड उपस्थित होते.

पनवेल : लोणिवली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सतीश मालुसरे यांना वाढदिवसानिमित्त भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, संतोष शेळके, सुधीर पवार, दिनेश पाटील.


































दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com